पाटील, को. शिवाजी पाटील आवक तपास करत आहेत.



**कमला कॉलेजमध्ये आयोजित शिबिरामध्ये आरोग्य तपासणी करताना डॉ. एस. के. अजेठराव, प्रा. वर्षा साठे, प्रा. अनिल घस्ते.**

# कमला कॉलेजमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

कोल्हापूर ■

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयाच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनींची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये उंची, वजन, रक्तगट, त्वचाविकार, नेत्ररोग, स्त्री आरोग्याच्या समस्या याची तपासणी करण्यात आली. यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विद्यार्थिनींच्या विविध आरोग्यविषयक तक्रारीनुसार वैद्यकीय सल्ला, औषधोपचार व मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरासाठी छ. प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयातील डॉ. एस. के. अजेठराव (नेत्ररोगतज्ज्ञ), डॉ. एस. बी. धुमाळे (त्वचारोग तज्ज्ञ), डॉ. सारीका देवरे (स्त्री रोग तज्ज्ञ), डॉ. प्रणाली टेंडुलकर (दंतरोग तज्ज्ञ), श्रीमती यु. एस. माने, स्मिता शिंदे यांनी आरोग्य तपासणी केली. प्रा. सौ. वर्षा साठे, प्रा. ए. एस. घस्ते यांनी संयोजन केले.

8/2/05